❊ वार्षिक स्नेहसंमेलन 'अंतरंगी' चे काही क्षणचित्रे ❊






















आज़ादी का अमृत महोत्सव

# झेप २०२३

गौरीशंकर सेवा समिती मलकापूर व्दारा संचालित

## विज्ञान महाविद्यालय, मलकापूर

**VIDNYAN MAHAVIDYALYA**
Malkapur, Dist. Buldhana - 443101
Website - www.vmvmlk.org
E-mail : vmvmlk1993@gmail.com

# झेप

## वार्षिकांक २०२२–२०२३

# झेप

## वार्षिकांक २०२२-२०२३


### - संपादक मंडळ -

**शिक्षक प्रतिनिधी** :- प्रा.डॉ. आर. टी. परिहार

प्रा.सौ. जे. एस. कुळकर्णी

प्रा. आर. एन. पाटील

**विद्यार्थी प्रतिनिधी** :- **मराठी विभाग :**

१) कु. मोहीनी गोपालराव गारमोडे

२) कु. वैष्णवी संतोष घोंगटे

**हिंदी विभाग :**

१) कु. अस्मिता अजयसिंग राजपूत

२) कु. धनश्री अनिल गवात्रे

**इंग्रजी विभाग :**

१) कु. कोमल सुरेश खाडे

२) कु. ऋतुजा अनिरुध्द देशपांडे

**उर्दू विभाग :**

१) कु. निदा अंजूम ईकतेदार अहमद खान

२) कु. जवेरीया मुस्कान अब्दुल जबीर पटेल

## *Vision, Mission & Goals of College...*

### Vision:

A scientific and educational community that is open and welcoming, creative and adaptive and renowned for excellence in knowledge and skills.

### Mission Statement:

We are committed to quality education, empowering personalities and development of responsible members of the society.

### Goals:

* To Impart quality based higher education in science for rural based society.
* To develop scientific approach, humanism, spirit of enquiry and reform in the youth of society.
* Utilization of acquired knowledge in problem solving of the society.
* Development of various basic skills among the students so as to become independent members of the society.
* To provide platform for the development of physical, mental and moral strength sport, extension and co-curricular activities.
* To attain community and social development through the optimum use of infrastructure facilities of the institution.
* To streamline the exuberance of youth for the sake of nation building.

# संपादकीय ......

विद्यार्थ्यांनमध्ये वाचन, लेखन, कौशल्य, जोपासण्याच्या हेतूने आपले महाविद्यालय प्रत्येक वर्षी 'झेप' हा वार्षिकांक २०२२–२३ प्रकाशित करत असते, त्याच शृंखलेतील हा अंक वाचकांच्या हाती देतांना मनस्वी आनंद होत आहे.

आजकाल टि.व्ही., मोबाईलमुळे विद्यार्थ्यांचे वाचन, लेखनाकडे दुर्लक्ष होत आहे. विद्यार्थ्यांनी ग्रंथाचे वाचन करुन उत्कृष्ठ साहित्य निर्मितीचे कौशल्य विकसित करण्यासाठी विद्यार्थ्यांनी विविध विषयावर लेख, कविताच्या माध्यमातून आपल्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी मराठी, हिंदी, इंग्रजी तसेच उर्दू या चार भाषांमधील विविध साहित्य प्रकाराचा या अंकात समावेश करण्यात आला आहे. ज्या विद्यार्थ्यांचे साहित्य या अंकात समाविष्ट झाले नाही त्यांनी अधिक दर्जेदार साहित्य निर्मितीसाठी प्रयत्न सुरु ठेवावे.

झेप घेण्याची वृत्ती अंगीच असेल तर कोणतेही बंधने येत नाही.

"आकाशी झेप घे रे पाखरा
सोडी सोन्याचा पिंजरा
तुज पंख दिले देवाने
कर विहार सामर्थ्याने...."

या वार्षिकांकासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि प्रिय विद्यार्थी मित्रांचे लाभलेल्या उत्तम सहकार्याबद्दल संपादक मंडळ ह्या सर्वांचे अत्यंत आभारी आहे. तसेच वार्षिकांकाचे मुद्रण श्री संतोष ग्राफीक्स ह्यांनी सुध्दा वेळेत करुन हा अंक छापून दिल्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

धन्यवाद !

**संपादक,**

**प्रा.डॉ. रमेश तुकाराम परिहार**

# प्राचार्य मनोगत...

झेप वार्षिकांक २०२२–२३ प्रकाशित करण्यासाठी घेतलेल्या मेहनतीबद्दल मी सर्वप्रथम संपादक मंडळाचे अभिनंदन करतो.

माझ्या प्रिय विद्यार्थी मित्रांनो आपले भावी आयुष्य घडविण्यासाठी गौरीशंकर सेवा समितीने सन १९९३ पासून चालविलेल्या विज्ञान महाविद्यालयाची निवड केल्याबद्दल आपले मन:पूर्वक अभिनंदन. संस्थेचे प्रेरणास्त्रोत स्व. दत्ताभाऊ महाजन (संस्थापक अध्यक्ष), सर्व संचालक मंडळाच्या अथक परिश्रमातून साकारलेल्या आपल्या महाविद्यालयातील 'झेप' वार्षिकांक विद्यार्थ्यांच्या लेखन कौशल्याला चालना देणारा २०२२–२०२३ अंक तुमच्या हातात देतांना मला मनस्वी आनंद होत आहे.

या स्पर्धेच्या युगात बेरोजगारी, अस्थिरता, असुरक्षितता असे अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत. त्यावर मात करण्यासाठी आपले महाविद्यालय सातत्याने प्रयत्न करीत आहे. प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये शिक्षक, शास्त्रज्ञ, लेखक, विचारवंत, उद्योजक लपलेला असतो. अशा विद्यार्थ्यांना त्यांच्या स्वप्नपूर्तीसाठी महाविद्यालय सातत्याने विविध उपक्रम राबविले जातात.

स्वातंत्र्याच्या प्रवासाला ७५ वर्ष पूर्ण झाले आहेत. आपण स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करीत आहोत. आपला भारत देश 'सुजलाम् सुफलाम्' आहे. आपल्या देशाला पौराणिक आणि ऐतिहासिक संस्कृतिचा वारसा लाभला आहे. अनेक जाती, धर्माचे, विभिन्न भाषांचे लोक येथे गुण्या गोविंदाने एकत्र नांदत आहेत. आज जागतिक पातळीवर आपली संस्कृती सर्वश्रेष्ठ मानली जाते आहे. भारत एकाच वेळी अध्यात्म आणि विज्ञानात अग्रेसर होत आहे. अनेक खेळ प्रकारात भारताने जागतिक दर्जाची कामगिरी केली आहे.

आपण वैज्ञानिक प्रगतीच्या मार्गाने झपाट्याने परिवर्तन करीत असतांना दुसऱ्या बाजूने वेगाने वाढणारा भौतिक व अभौतिक समस्यांच्या दृष्ट विळख्यात अडकून स्वातंत्र्याचा श्वास गुदमरण्याच्या अगोदरच आपण सावध होऊन योग्य तो बदल घडवून आपले व आपल्या देशाचे नांव पूर्ण विश्वात अजरामर करावे हेच आव्हान स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त करतो.

बदल हा निसर्गाचा नियम आहे. काळाबरोबर बदलत्या प्रवाहात राहून सतत नाविण्याचा ध्यास घेणे हे जीवंत माणसाचे लक्षण आहे. म्हणून भविष्य काळात येणाऱ्या नविन शैक्षणिक धोरण २०२० ला सामोरे जाण्यासाठी विद्यार्थी हा सक्षम व्हावा ही अपेक्षा शेवटी सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी खूप खूप शुभेच्छा...!

**प्राचार्य**
**डॉ. बी. बी. वानखडे**

# उपप्राचार्य मनोगत...

ग्रामीण भागातील मुलामुलींना विज्ञानाच्या उच्च क्षिणाची गंगा आपल्या मलकापूर नगरीत आणून खऱ्या अर्थाने मानवतेचे कल्याण साधणे हे मुख्य उद्दिष्ट उराशी बाळगुन या महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली. स्थापनेपासून आजपर्यंत या ज्ञान वृक्षाच्या छायेत अनेक पिढ्या ज्ञान संपन्न झाल्यात आणि विविध क्षेत्रात नावलौकीक मिळवत त्यांनी आपले तसेच समाजाचे जीवन सुखी, समृध्द केले.

आजची तरुण पिढी फार संवेदनशील आहे. ती केवळ स्वप्नरंजक नसून वास्तववादी आहेत. आजुबाजुला घडणाऱ्या बदलांचे सुक्ष्म परीक्षण करुन नवा दृष्टिकोन अंगीकारत आहे. विद्यार्थ्यांच्या सुप्त कला गुणांना वाव मिळण्यासाठी ‘झेप’ हा वार्षिकांक प्रकाशित करीत आहोत.

**उपप्राचार्य**

**डॉ. वाय. पी. पाटील**

# अनुक्रमणिका


| | शिर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | विद्यार्थ्यांच्या कुंचल्यातून साकारलेली कलाकृती | १ ते २ |
| २ | मराठी विभाग | ३ ते २५ |
| ३ | हिंदी विभाग | २६ ते २७ |
| ४ | इंग्रजी विभाग | २८ ते ३६ |
| ५ | उर्दू विभाग | ३७ ते ३८ |
| ५ | महाविद्यालयन शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी | ३९ ते ४१ |

## ✻ विद्यार्थ्यांच्या कुंचल्यातून साकारलेली कलाकृती ✻





# ✻ विद्यार्थ्यांच्या कुंचल्यातून साकारलेली कलाकृती ✻





**Pratiksha Narkhede**
B.Sc. I (CPS)

# अक्षयदान....

**प्रा.सौ. राजश्री राजेश महाजन**
संगणकशास्त्र विभाग



## स्व. श्री दत्तात्रय गो. महाजन (भाऊ)
### अध्यक्ष गौरीशंकर सेवा समिती

भाव मनात असावा हे अगदी खरे असले तरी काही वेळेस एखाद्या विषयाच्या किंवा एखाद्या आदरणीय व्यक्ती बद्दल असलेल्या आपल्या भावना, आपले मत शब्दात व्यक्त करावे वाटते.

मला जेव्हा पण लिहिण्याची संधी मिळते तेव्हा मला भाऊं बद्दल मनापासून लिहायला आवडते. याचे कारण त्याचे असामान्य व्यक्तिमत्व, त्याचे कर्तृत्व, त्याचा विनम्रपणा, प्रत्येका प्रती असलेला त्याचा स्नेह, आपुलकी असे एक नाही तर अनेक गोष्टी इतक्या मोठ्या होत्या की त्याच्याबद्दल भरभरुन, खूप काही लिहू शकतो. काही मोजक्या शब्दात त्याला संपवता येत नाही असे म्हणतात की मनुष्य किती जगला यापेक्षा तो कसा जगला याला विशेष महत्व आहे. भाऊंना लाभलेले आयुष्य खरोखरच लाखात एखाद्यालाच लाभते.

भाऊ म्हणजे परोपकार वृत्ती, औदार्य व दयाळूपणा या गुणांचा संगम होते. आपल्या हिंदू संस्कृतीत दानाला खूप महत्व आहे आणि जर हे दान 'विद्यादान' च्या स्वरुपात असेल तर त्यापेक्षा श्रेष्ठ असे काहीच नाही. कारण विद्येचा कधीही क्षय किंवा ऱ्हास होत नाही. दान देतांना किंवा परोपकार करताना भाऊंनी कधीच कंजुसकी दाखवली नाही आणि दिलेल्या दानाचा किंवा परोपकाराचा कधी त्यांनी उल्लेख केला नाही. ते नेहमी गुप्त असायचे. गाजावाजा करणे हे त्यांच्या स्वभावातच नव्हते आणि हा त्यांच्या स्वभावातला एक अतिशय दुर्मिळ गुण होता. ज्या व्यक्तीला मदत केली ती व्यक्ती ते स्वत: सांगेल तरच ते समजायचे नाहीतर ते गुप्त असायचे. असे कितीतरी लोक आहेत ज्यांना भाऊंनी मदत केली आहे आणि आम्हाला ते त्या लोकांच्या सांगण्यावरून नंतर कळाले.

दानेन तुल्यो विधिरस्ति नान्यः ।
लोभाच्च नान्योऽस्ति रिपुः पृथिव्याम् ।।
विभूषणं शीलसमं न चान्यत् ।
संतोष तुल्य धनमस्ति न्यान्यत् ।।

म्हणजे "दानासारखे या पृथ्वीवर दुसरे धर्मकृत्य नाही. लोभासारखा दुसरा शत्रू नाही. चारित्र्यासारखा दुसरा उत्कृष्ट अलंकार नाही आणि समाधानासारखे दुसरे धन नाही." भाऊ या सर्वच बाबतीत खूप धनवान, पुण्यवान होते. श्रीमंती, वैभव हे सर्व असतांना त्यांचा साधेपणा या सगळ्यांत अगदी उठून दिसायचा. साधीराहणी, उच्चविचार सरणी व नम्रता हे गुणच त्यांची खरी संपत्ती, खरे वैभव होते.

मलकापूर सारख्या गावात भविष्यातील

आव्हान, तंत्रज्ञानाची गरज आणि हुशार तसेच गरजू विद्यार्थीना संधी मिळावी ही काळाची गरज लक्षात घेऊन भाऊंनी विद्यादानासाठी, शैक्षणिक क्षेत्रात एक संस्था उभारण्यासाठी आपली जमीन देऊन सिंहाचा वाटा उचलला. अन्न, पैसा आणि संपत्ती हे क्षणिक असते, कधी तरी त्याचा क्षय होतो परंतू एकदा आत्मसात केलेले ज्ञान कधीच क्षय पावत नाही, ते अक्षय असते. जीवनाच्या प्रत्येक वळणावर ते उपयुक्त असते. कदाचित हे भाऊंच्या लक्षात आले आणि म्हणूनच त्यांनी गौरी–शंकर सेवा समितीची स्थापना करून एका भव्य दिव्य व अतिशय सुंदर अशा शिक्षण संस्थेचा पाया रचला. त्याच गौरीशंकर सेवा समितीच्या अंतर्गत असलेली शाळा आणि महाविद्यालयामध्ये आज हजारो विद्यार्थी त्याचा लाभ घेत आहेत. म्हणूनच मला नेहमी वाटते की शाळेच्या, महाविद्यालयाच्या या वास्तूच्या प्रत्येक कामाच्या क्षेत्रामध्ये सर्व सहकार्यांसोबत भाऊंचा मोलाचा वाटा आहे. विंदा करंदीकरांच्या कवितेतील काही ओळी भाऊंच्या बाबतीत तंतोतंत खऱ्या ठरतात.

**पाय असावे जमिनीवरती कवेत अंबर घेताना**
**हसू असावे ओठांवरती काळीज काढुन देताना–**
**करून जावे असेही काही दुनियेतुनी या जाताना**
**गहिवर यावा जगास साऱ्या निरोप शेवटचा देताना**

शैक्षणिक क्षेत्रातील त्यांच्या या कार्यामुळे त्यांनी आपल्या सगळ्यांना हे ‘विद्यादान’ जे की ‘अक्षयदान’ च्या रुपात देऊन जेव्हा जगाचा निरोप घेतला तेव्हा नक्कीच त्यांना अक्षय सुखाची प्राप्ती झाली असेल यात यतकिंचितही शंका नाही.

****



## आजीवन विद्यार्जन ....

**प्रा. अदिती मुरलीधर पाटील**
संगणकशास्त्र विभाग

माणूस हा आजीवन एक विद्यार्थीच असतो. विद्यार्जन करणाऱ्याला विद्यार्थी म्हणतात. विद्यादान करण्यासाठी आधी अध्ययन करावे लागते. हे अध्ययन माणूस पुस्तक वाचूनच करतो असे नाही, तर कधी इतरांच्या अनुभवांतून सुद्धा माणूस शिकत असतो. अनुभवामुळे अध्ययन हे सोपे होऊन जाते आणि अनुभव प्राप्त करण्यासाठी अभ्यास करावा लागतो. अभ्यास म्हणजे, एखादी गोष्ट पुन्हा पुन्हा करणे. आपण जेव्हा परत परत एखादी कृती करतो, त्यातून आपल्याला प्रत्येक वेळचे निष्कर्ष मिळत जातात असे अनेक निष्कर्ष मिळून माणूस त्या विशिष्ट विषयांमध्ये पारंगत होत जातो. पण एका विषयांमध्ये पारंगत होऊ नये मानव गुणाप्रमाणे नवीन विषयाचे आकलन करण्याची माणसाची ओढ काही कमी होत नाही. कारण मुळातच मानवी स्वभाव हा सर्जनशील आहे. हिच सर्जनशीलता माणसाला शांत बसू देत नाही. रोजच्या जगण्यातून समोर येणाऱ्या अपरिचित गोष्टीचा अभ्यास करण्यासाठी माणूस पुन्हा सज्ज होतो. पुन्हा नविन अभ्यास सुरु होतो.

विद्यार्थी ज्याप्रमाणे विषयाशी संबंधित ज्ञानप्राप्तीसाठी अध्यापकाची मदत घेतात. त्याप्रमाणे माणसाला सुद्धा रोज येणाऱ्या चांगल्या वाईट अनुभवांतून चित्त स्थिर करण्यासाठी परमात्म्याशी एकरूपता साधावी लागते. शिक्षण घेणं सोप असतं, पण त्या शिक्षणासोबतच नम्रपणा टिकवून ठेवणे, यातून खरा व्यक्तिमत्त्वाचा दर्जा ठरत असतो. हा नम्रपणा माणसाला साधण्यासाठी माणसाला अध्यात्माचा आधार घ्यावा लागतो. शिक्षणाने माणूस सुशिक्षित बनतो तर अध्यात्माने सुसंस्कृत सुशिक्षीत व संस्कृतपणा यांची सांगड घातली की व्यक्तिमत्त्वाला सोनेरी लकाकी येते. माणसाच्या जगण्याला अध्यात्माची साथ असेल तर जगणं सहज होऊन जात आणि विद्यार्जन करताना माणसाला काय घ्याव आणि काय सोडून दयावं, यातला फरक स्पष्ट कळायला लागतो. आयुष्यभर सुरु राहणार विद्यार्जन सोपं होऊन जातो.

******

# ठेच लागलीच पाहिजे, माणूस कणखर होतो..

**प्रा.सौ. पूनम इंगळे**
विभाग प्रमुख संगणकशास्त्र

मित्रांनो ! आयुष्यात ठेच लागल्याच पाहिजेत. अक्षरश: रक्तबंबाळ व्हावं इतक्या ।।

कुणीतरी प्रचंड विश्वासघात केला पाहिजे, कुठेतरी फसवणूक झाली पाहिजे, जवळची माणसे तिऱ्हाईता सारखी वागली पाहिजेत. गरज असताना सोडून गेली पाहिजे, कुठल्यातरी क्षणी भीतीने गाळण व्हावी, सगळ्यांच्यात असून एकटेपणाची भावना यावी. एकाचवेळी सगळी संकटे यावीत आणि इतकी की त्या क्षणी असं वाटावं की आता सगळं संपलं.

परिस्थितीसमोर गुडघे टेकायची वेळ यावी, कधीतरी घोर अपमान व्हावा, कुठेतरी स्वाभिमान दुखावला जावा काही ठिकाणी तर त्याला गहाण टाकण्याची वेळ यावी, कधी तरी कुणाच्या पाया पडायला लागावं, गरज नसताना सुद्धा कुणाची तरी हजारवेळा माफी मागायला लागावी. कित्येक रात्री ह्या त्रासांनी निद्रेचा नाश व्हावा, रडून रडून डोळे सुजावेत इतका अफाट त्रास व्हावा ! अक्षरश: सगळं सोडून जावं की काय असं वाटावं...

अन मग बघावं या वेदनातून तावून सुलाखून निघाल्यावर उभ राहतं ते एक वेगळंच अजब रसायन.

ज्याला कुणाच्या असण्या–नसण्याचा काही फरक पडत नाही. तो जगतो फक्त 'आलात तर तुमच्याबरोबर नाहीतर तुमच्याशिवाय' या एकाच तत्वावर.

ज्याचा कितीही विश्वासघात झाला, अपमान पदरी आला, फसवणूक झाली तरी हारण्याच्या, मागे हटण्याच्या विचाराना जो कधीच भीक घालत नाही.

ज्याचा विश्वास असतो फक्त स्वत:वर आणि तो बिंबवून घेतो "साला कुछ भी होने दे मगर हम हटेंगे नहीं और हटने का भी नहीं ।" पण कसं आहे, एवढं सगळं होण्यासाठी आधी ठेचा लागाव्याच लागतात.

ठेच एक अनुभव, जीवनाचा एक अध्याय... एकाची समाप्ती तर दुसऱ्या अध्यायाचा आरंभ.

त्यातूनच तर माणूस शिकतो जीवनाचं शहाणपण व बळकटपणा....

शिकायला मिळतं माणूस कणखर होतो...

*****

# स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव...

**कु. धनश्री अनिल गवात्रे**
बी.एस.सी. भाग २ (गणित)

**स्वातंत्र्य वीरांना करुया शत शत प्रणाम**
**त्यांच्या निस्वार्थ त्यागानेच भारत बनला महान.**

कवी कुसुमाग्रज यांनी केलेल्या या आवाहनाचे सार्थक होण्यास १५ ऑगस्ट १९४७ चा दिवस उजाडला. पक्षी पिंजऱ्यातून उडाला. स्वातंत्र्याची रम्य प्रभात झाली. असंख्य बलिदानांचे सार्थक झाले आणि भारताला पारतंत्र्यातून मुक्तता मिळून स्वातंत्र्य मिळाले. बघता–बघता स्वातंत्र्याचा प्रवास ७५ वर्षाचा होत आहे..... आज आपण भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करीत आहोत. एखाद्या राष्ट्राच्या जीवनाचा ७५ वर्षांचा कालखंड हा जरी फार मोठा टप्पा नसला तरी, राष्ट्रातील नागरिकांच्या जीवनात स्वातंत्र्याची ७५ वर्ष पूर्ण करणे अनन्यसाधारण महत्त्वाचे आहे.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात आपली स्वातंत्र्याविषयी कोणती स्वप्ने होती? स्वतंत्र्याकडून आपल्या कोणत्या अपेक्षा होत्या ? आज सत्य काय आहे? कुठे होतो आपण आणि आता कुठे आहोत? उणिवा काय राहिल्या? आणि भविष्यात कशी पावले उचलावी लागतील...? याचा विचार आपल्याला करावा लागेल. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात आपण काय कमावलं आणि काय गमावलं? याचे सिंहावलोकन करण्याच्या टप्प्यावर आपण येऊन पोहोचलो आहोत. भारत हा नैसर्गिक साधनसंपत्ती आणि खनिज समृद्ध देश आहे. माथी हिमालय उभा आहे. पायी सागराच्या लाटा लोळण घालत आहेत. देशातून गंगा–गोदावरी, ब्रह्मपुत्रा सारख्या रक्त वाहिन्या वाहत आहेत. निर्जीव पक्षी आकाशी भरारी मारतो आहे. सैनिक/ जवान डोळ्यात तेल घालून देशाची सीमा रक्षण करत आहेत. किसान लोकराजा बनला आहे. आपल्या देशाला शिमला, कुल्लु, मनाली, उटी सारखी समृध्द पर्यटन स्थळे लाभली आहेत. एकूणच आपला भारत देश 'सुजलाम सुफलाम' आहे, आपल्या देशाला पौराणिक आणि ऐतिहासिक संस्कृतीचा वारसा लाभला आहे. अनेक जाती, धर्माचे, भाषांचे लोक येथे गुण्यागोविंदाने एकत्र नांदत आहेत. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत कबीर यांच्यासारख्या थोर संतांची भूमी असलेला आपल्या देशाचा संस्कृती आज जागतिक पातळीवर सर्वश्रेष्ठ संस्कृती मानली जाते. भारत एकाच वेळी अध्यात्मात आणि विज्ञानातही अग्रेसर होत आहे. अनेक खेळ प्रकारात भारताने जागतिक दर्जाची कामगिरी केली आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात गेली ७५ वर्ष साहित्य, कला, क्रीडा, संस्कृती या क्षेत्रामध्ये नामवंत लेखक, साहित्यिक व कलावतांनी आपला ठसा उमटवला आहे

पण असे असले तरी एकीकडे प्रगती होत आहे आणि दुसरीकडे अनेक गोष्टी आपल्याला वेदना देत आहेत. स्वातंत्र्यासाठी अनेक शूर वीरांनी ऐन तारुण्यात बलिदान दिले. आपले संपूर्ण आयुष्य स्वातंत्र्यासाठी खर्च

केले. स्वातंत्र्यासाठी त्यांनी रक्ताचा सडा सांडला. पण आम्ही मात्र रक्ताचा घाऊक बाजार मांडला... असं कधी कधी उगाचच वाटते. आज चीन–पाकिस्तान सारख्या परकीय शक्ती सीमेवर आक्रमणाच्या तयारीत असतात. देशांमध्ये दहशतवादी हल्ले होतात. उरी, पुलवामा सारख्या रक्ताळलेल्या आठवणी आपल्याला दुःख देतात. या देशातल्या शेतकऱ्याला आपल्या हक्कांसाठी आंदोलन करावे लागले. अनेक गरिबांना एक वेळचे जेवण सुद्धा मिळत नाही. स्वर्गासारखा काश्मीर गुलाबाच्या सुगंधाने दरवळत रहाण्याऐवजी रक्तात रंगताना पाहायला मिळतो. धर्माच्या नावावरून जातीय दंगली होतात, तेव्हा स्वातंत्र्याच्या ठिकऱ्या उडतात. भारत मातेच्या हृदयाचे शेकडो तुकडे होतात. एकाच आईची लेकरे एकमेकांच्या रक्तासाठी तहानलेली असतील तर.. त्या आईची काय अवस्था होत असेल ? या साऱ्या आक्रमणामध्ये अतिशय सामान्य माणूस भरडला जातो. जळणारी झोपडी आणि करपणारे रक्त मात्र भारतीयच आहे हे आपण का विसरतो? हा खरा प्रश्न आहे. भ्रष्टाचाररूपी यंत्रणेमुळे मोठी व्यवस्था पोखरली जाते. रोज मोठ्या अधिकाऱ्यांना भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली अटक होते, तेव्हा ज्यांच्या हाती आपण देशाची प्रशासन व्यवस्था सोपवली आहे, तेच भ्रष्टाचाराने बरबटलेले पाहून असंख्य वेदना होतात. तुरुंगात असताना अनेक गुन्हेगार निवडणुका जिंकतात, दरवर्षी मोठमोठे घोटाळे उघडकीस येतात. सामान्य माणसाच्या हक्काची भाकरी गिळकृत करणारी मंडळी या देशाचे मारेकरी आहेत. ‘सत्यमेव जयते’ हे ब्रीदवाक्य आपल्या देशाची शान आहे. परंतु अशा दृष्ट प्रवृत्तीमुळे देश शोकग्रस्त होतो. कधीकधी देशासाठी फासावर चढणारे तरुण अवघ्या चौदाव्या वर्षी शरीरावर गोळी स्विकारणारे शिरीषकुमार सारखे तरुण पाहिले तर आजच्या या तरुण पिढीकडे हस्तांतरित करण्यात आलेल्या स्वातंत्र्याचा अर्थ त्यांना कधी कळेल का? असा प्रश्न पडतो.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात आपल्याला एक गोष्ट मान्यच करावी लागेल की, भारतीय स्वातंत्र्याने आपल्याला खूप काही दिले आहे. परंतु जो असमाधानाचा, असंतोषाचा सूर निघत आहे. त्याला आपणच जबाबदार आहोत. आपली आर्थिक, सांस्कृतिक औद्योगिक प्रगती झाली पण मूल्यांचा ऱ्हास होत गेला. म्हणूनच एकीकडे आपण वैज्ञानिक प्रगतीच्या मार्गाने झपाट्याने परिवर्तन करीत आहोत. परंतु त्याच वेळी दुसऱ्या बाजुने वेगाने वाढणाऱ्या भौतिक व अभौतिक समस्यांच्या दृष्ट विळख्यात आपण अडकल्याने स्वातंत्र्याचा श्वास गुदमरतोय... अशी अवस्था झाली आहे, म्हणूनच स्वातंत्र्याच्या या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त देशातील जनतेला एवढेच आव्हान करता येईल....

*“शिरावर ज्याच्या हिमालयाचा ताज आहे*
*प्रत्येक भारतीयाच्या हृदयावर ज्याचे साज आहे*
*पूर्ण विश्वात ज्या राष्ट्राचा आवाज आहे*
*अभिमानाने सांगते भारत माझा देश महान आहे”*

आपल्या भारत देशाची जगात ओळख भौगोलिक दृष्ट्या संपन्न देश, सुसंस्कृत देश अशी आहे. आपला भारत देश सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य, गणसज्य असल्याचा आपल्याला अभिमान आहे तसेच भारताने जगाला दिलेली अमूल्य देणगी म्हणजे लोक शाही शासनव्यवस्था व भारतीय सविधान होय.

आपल्या भारत देशाने कृषी, औदयोगिकीकरण, उद्योग, क्रीडा, व्यापार, दळणवळण, शिक्षण, आरोग्य, संरक्षण, संशोधन, ज्ञान, विज्ञान इत्यादी क्षेत्रात अभूतपूर्व वाटचाल केली आहे. सर्वच क्षेत्रांत भारत देश प्रगती पथावर आहे. भारतीय स्वातंत्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त भारत सरकारने अनेक उपक्रम हाती घेतले आहेत आपल्या देशाच्या गौरवासाठी, राष्ट्रध्वजाच्या सन्मानासाठी जनजागृतीसाठी दिनांक १३ ऑगस्ट २०२२ ते १५ ऑगस्ट २०२२ या कालावधीमध्ये 'घर घर तिरंगा' अभियान राबविले गेले.

चला तर ज्या देशाला वैभव संपन्न इतिहास आहे, नाविण्यपूर्ण भूगोल आहे, नीति शास्त्र आहे, धर्मशास्त्र आहे, जी भूमी संत, पंडित व शुरवीराची आहे, जी भूमी भक्ती, निष्ठा, त्याग, श्रध्दा, आदर अशा कितीतरी कीर्तीच शिखर आहे. अशा या पुनत व मंगल भूमीला म्हणजेच, आपल्या भारत देशाला सर्वांना एकत्र येऊन, एकजुटीने काम करून जगात सामर्थ्यशाली देश बनवूया. चला हा स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव मोठ्या उत्साहात आणि आनंदाने साजरा करूया, या निमित्ताने मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या देशाच्या सर्व शूर, स्वातंत्र्य सैनिकांना आणि नेत्यांना नमन करुया.

''स्वातंत्र्याच्या जल्लोषाचा
महिमा हा आगळा
अमृत महोत्सवी वर्षात
साजरा करू उन्नतीचा सोहळा
स्वातंत्र्याचे जतन कराया,
त्यागाचा मार्ग धरू वेगळा !!''

**जय हिन्द ! जय भारत !**

****



# स्त्री म्हणून माझी जडणघडण...

**गायत्री प्रकाश आंबेकर**
बी.एस.सी. भाग २ (संगणकशास्त्र)

**"स्त्री जन्मा तुझी कहाणी**
**ह्रदयी पान्हा नयनी पाणी"**

स्त्रीची अनेक रूपे आहेत. पूर्ण विश्वाला व्यापून राहिलेली स्त्री अध्यात्माने स्त्रीला दिलेले अनन्य साधारण महत्त्व. स्त्री म्हणजे ईश्वर व आत्मा यांचे मिलन विश्वनिमिती हे सर्व असूनसुद्धा स्त्री अबला ! पण आज स्त्रीच्या बाबतीत मागे वळून पाहिले तर तिची शोकांतिका समोर येते. महाभारताच्या काळापासून आजपर्यंत स्त्रीचा स्वार्थासाठी वापर केला गेला. तिच्याकडून प्रचंड अपेक्षा केल्या गेल्या. जन्माला आल्यापासून आतापर्यंत अपेक्षा पूर्ण करता करता ती आपले अस्तित्वच विसरून गेली. मुलगी म्हणुन आई वडील यांची अपेक्षा पत्नी म्हणुन पती समाज कुटुंबातील सदस्याची अपेक्षा, आई झाली की मुलाच्या अपेक्षा हे सर्व करताना स्वतःच्या अस्तित्वाचा विचार तिने कधी केला? आपल्या पतीसाठी डोळ्यावर पट्टी बाधून गांधारीने पत्नीत्व धर्म निभावला उर्मिलेचे आयुष्य लक्ष्मणाच्या प्रतिक्षेत संपले अशा आज अनेक स्त्रिया आहेत ज्या अनिच्छेने जगतात. इतकेच नव्हे तर स्त्री सहनशील आहे. म्हणुन अनेकांचे संसार शाबुत आहेत. नाही तर पाश्चात्य पद्धतीने सकाळी लग्न तर सध्याकाळी घटस्फोट झाला असता पण आज गरज आहे स्त्री जागृतीची, डोळसपणे जगण्याची, आपले अस्तित्व शोधण्याची. प्रथम स्त्रीने आपल्या स्त्रीत्वाचा अभिमान बाळगला पाहिजे. मुलगी जन्माला येण्यापासून रोखु नये. यामुळे समाज संतुलन राहीलच. स्त्रीला समाजात वावरणे सहज व सुरक्षित होईल.

प्रचलित समाजाने स्त्रीला शिक्षणापासून वंचित ठेवले पण सावित्रीबाई फुले यांच्या कर्तृत्वाने शिक्षणाची दारे खुली झाली. समाजात प्रत्येक क्षेत्रात स्वतःला पुर्णपणे झोकून देणाऱ्या स्त्रीची प्रगती दिवसेंदिवस गतिमान होऊन देशाच्या प्रमुख पदावर स्त्री विराजमान झाली. निसर्गाने अबला बनविलेल्या स्त्रीने आपली शेतीपासुन अवकाशापर्यंत प्रगती केली. स्त्री ही पुरुषाच्या बरोबरीने समाजात वावरते आहे पण, स्त्री खऱ्या अर्थाने मुक्त झाली का? स्त्रीने आज जागे व्हावे व प्रचलीत कर्मठ समाजबंधने झुगारून आपल्या स्त्रीमुक्तीचा झंझावात सुरू करावा.

स्त्री मुक्ती म्हणजे काय? हे प्रथम जाणावे. पँट शर्ट घालून अवेळी घराबाहेर पडणे किंवा घरी उशिरा येणे म्हणजे स्त्रीमुक्ती नव्हे. शिक्षणाच्या नावाखाली गैरमार्गाने जाणे, आधुनिकतेच्या नावाखाली जुन्या वयस्कर व्यक्तीचा अपमान करून कुटुंब स्वास्थ, प्रेम बिघडून पार्टी सभा करणे म्हणजे स्त्रीमुक्ती नव्हे, स्त्री मुक्ती म्हणजे नवीन विचार आदर्श जोपासुन पुढे जाणे शिक्षणाबरोबर विनय संस्कार व संस्कृती यांची जोपासना करून अंधश्रध्दा झुगारून नवीन विचार स्विकारणे म्हणजे स्त्री मुक्ती. समाजात स्त्रियांच्या आत्महत्येचे प्रमाण वाढत चालले आहे ही बाब गंभीर नाही का? समस्यावर उपाययोजना करून त्यातून बाहेर पडण्याचे प्रयत्न केले पाहिजेत यासाठी समाज व आई-वडील यांचे सहकार्य मोलाचे ठरते. आजची स्त्री सक्षम बनली पाहिजे. शिक्षणाबरोबर नवीन विचारधारा घेवून स्त्रीने मनाने व शरीराने सदृढ होणे आवश्यक आहे कारण आजच्या

स्त्रीला वाचविण्यासाठी कोणताही कृष्ण येणार नाही कारण हे राज्य आहे अधर्माचे. आज रिंकू पाटीलची पुनरावृत्ती होता कामा नये यासाठी गरज आहे. शिक्षणाची, विज्ञानाची, तंत्रज्ञानाची कास धरूर उत्तरोत्तर प्रगती करणे गरजेचे आहे नाहीतर पुन्हा रावणाचे राज्य होईल तिथे असेल फक्त पैसा सत्तेसाठी व्यभिचार अत्याचार शोषणा या सर्वात भरडली जाईल.

आज स्त्री सक्षम बनली पाहिजे, आज आदर्श पिढी घडवायची असेल तर त्यासाठी स्वतःपासून सुरुवात करा. समाजात जे स्वतःला ज्ञानी शिक्षित समजतात. हे लोक ज्ञानाचा उपयोग पैशासाठी करतात व जुने स्विकारतात. मुळात मुलीला जन्माला घालू इच्छित नाहीत आणि जन्माला घातलेच तर तिला दुय्यम स्थान दिले जाते. परिणाम स्वरूप मुलगा भविष्यात आई–वडीलांचे प्राण घेण्यास मागे पुढे पाहत नाही, तेव्हा मुलाना दोष देऊ नका. कारण,

*मुल म्हणजे मातीचा गोळा*
*आकार दयावा तशी मुर्ती घडते,*

आज स्त्रीवर फार मोठी जबाबदारी आहे. उद्याचा आदर्श समाज घडवून समाजाचा ऱ्हास थांबविणे तिच्या हाती आहे. जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाची उध्दारी. एडस सारख्या भयावह रोगाने आज थैमान घातले आहे. मुलीनी डोळसपणे समाजाकडे व जीवनाकडे पाहावे. खोट्या सुखाच्या कल्पनेत रममान होण्यापेक्षा वास्तवाचे भान ठेवून यशस्वी जगावे. लग्नाच्या वेळी पत्रिका घराणे संबंध पाहण्यापेक्षा मुलाचे कर्तृत्व, नितीमत्ता, वैदयकीय तपासणी यावर भर दयावा आंधळेपनाने प्रेम न करता डोळसपणे जीवन सवंगडी शोधावा तरच जीवन यशस्वी होईल म्हणून मी असे म्हणेन

*'नारी नारी मत कहो,*
*नारी एक नर की शान*
*जिससे पैदा हुए है राम,*
*कृष्ण, हनुमान''*

बाबासाहेबांनी हे ओळखून स्त्रियाचे कौटुंबिक आणि व्यक्तीगत जीवन सर्वांगाने स्वतंत्र केले. त्याच बरोबर समाज पातळीवरही तिच्या प्रश्नाची तितक्याच गांभीर्याने सोडवणूक केली. स्त्री म्हणून जिथे तिथे तिचे शोषण होते. ते सर्व कालबाहय नियम, कायदे, प्रथा, परंपरा याना मुठमाती देण्याचे बळ महिलाच्या अंगी येण्या साठी जे जे करता येईल ते त्यांनी केले. भारतीय व्यवस्थेत तिचे स्थान अतिशय तळाशी होते. शुद्र–अतिशुद्र अशी तिची अवस्था होती म्हणुन तिच्या शोषणाच्या संधीही अधिक होत्या. तिच्या कामाला श्रमालाही मुल्य दिले जात नव्हते यामुळे कामाच्या ठिकाणीही तिचे शोषण होत असे. तिला दुय्यम वागणूक दिली जात असे बाबासाहेबानी या सगळ्याच क्षेत्रात महिलाना न्याय मिळवून दिला.

बाबासाहेबांनी खानीतील महिला कामगारांच्या प्रश्नाची सोडवणूक केली. त्यांच्याच प्रयत्नांमुळे ब्रिटीश सरकारमध्ये बाबासाहेब मजूर मंत्री असतांना स्त्री–पुरुषाना समान वेतन मिळण्याचा कायदा केला. काम करणाऱ्या महिलांना प्रसुतीपूर्व काळात ठराविक विश्रांती आणि सेवा मिळाली पाहिजे यासाठी कायदे केले.

प्रसुतीची रजा मंजुर करण्याचाही कायदा केला. बाबासाहेबांचा प्रज्ञा, शील आणि करुणा या तत्त्वज्ञानावर असिम प्रेम होते. नीती आणि चारित्र्य हे केवळ स्त्रियांचा अंलकार आहेत असे भारतीय समाजात मानले जात होते पण बाबासाहेबानी नीती आणि चारीत्र्य हे अलंकार पुरुषानाही आवश्यक आहेत असे ठामपणे सांगितले. केवळ प्रज्ञा असुन चालत नाही प्रज्ञेबरोबरच शिल आणि करुणा स्त्री पुरुषाच्या अंगी नसतील तर माणूस माणूस राहत नाही आपण नागरिकरणाची प्रक्रिया उत्तमपणे राबवली नाही व यामुळे घटनात्मक मुल्यापेक्षा आपली जात आणि धर्माच्या परंपरागत प्रथाच्या जोखडात आपण बांधले गेलो आहोत.

'नीतीमान आणि चारित्र्यसंपन्न नागरिक आपण घडवू शकलो नाहीत त्यातुनच स्त्रीला उपभोग्य वस्तू समजुन तिच्या शरीराचे लचके तोडण्याची मानसिकता वाढीस लागली आहे. सार्वजनिक जीवनात नीतीभ्रष्ट चारीत्र्यहीन व्यक्तीना महत्व, प्रतिष्ठा प्राप्त होत आहे म्हणून हैदराबाद मध्ये पशुवैदयकीय महिला अधिकाऱ्यावर अमानुषपणे बलात्कार करण्याची घटना असे प्रकार थांबले पाहिजेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय स्त्रियांच्या आर्थिक सामाजिक राजकीय सांस्कृतिक शैक्षिणक अशा विविध अंगांनी सक्षमीकरण करण्याचा कार्यातील अग्रणी महामानव आहेत. एवढेच न्हे तर स्त्री मुक्तीचे तेच खरे प्रणेते आहेत. असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

अशाप्रकारे स्त्रीच जीवन असतं स्त्रीच्या जीवनात खुप अडचणी असतात. स्त्रीच्या जीवनाची जडणघडण खुप खडतर प्रकारे होत असते.

✻ स्त्रीशिवाय जीवनातील सर्व सुखे व्यर्थ आहेत.

✻ स्त्री क्षणभर रागवते पण आयुष्यभर प्रेम करते.

✻ देवाकडे काही मागतांना प्रथम आईसाठी आयुष्य मागा तुमचे आयुष्य आपोआपच वाढेल.

✻ स्त्री सुशिक्षित असो किंवा अशिक्षित असो जेव्हा अपयशी होता तेव्हा तुमचा खरा मार्गदर्शक स्त्री असते.

✻ स्त्री तुझ्या चरणी वैकुंठ तुच माझा पांडुरंग स्त्री उच्चारानेच होईल सगळ्या वेदनांचा अंत.

✻ आपल्या नशिबात एकही दु:ख नसतं जर आपलं नशीब स्त्रीने लिहिलं असतं.

स्त्री जिवाश्मांची वसुंधरा तू, यौवनाची कामिनी तू,
हिमतीची वाघिनी तू, कुळाची स्वामिनी तू .....

✻✻✻

*तक्रार नाही की थकवाही नाही, जबाबदारीसह घेते भरारी*
*नारीमध्ये शक्ती भारी, का समजता तिला बिचारी*

✻✻✻✻

*स्त्री म्हणजे कोमलता, कोलमतेत प्रचंड सामर्थ्य असते.*
*म्हणूनच खडक झिजतात, तर प्रवाह मात्र रुंदावतो*

✻✻✻✻

# पुरुष म्हणून माझी जडणघडण....



**कु.वृंदावनी प्रविण पाटील**
एम.एस.सी. भाग १ (रसायनशास्त्र)

पुरुष.... पुरुष म्हटले कि प्रथम आठवतात माझे बाबा....

ज्यांनी माझ्या व सर्व घरच्यानंच्या आयुष्यासाठी सर्वस्व पणाला लावलं. पुरुष म्हणून जगणे हे आपल्याला वाटते तेवढं सोपं नाही. पुरुषांच्या जीवनात घरातील सुख कमी पण बाहेरचे दुःख भरपूर असतात. आपण म्हणतो बाई माणूस घर चालवते पण ते घर चाललं पाहिजे, सर्व गरजा पूर्ण झाल्या पाहिजे कसली कमतरता यायला नको म्हणून पुरुष हा धडपड करत असतो. एक दिवस किंवा एक वर्ष सर्व गरजा सर्व सुविधा भेटाव्या म्हणूनच नाहीतर आपल्या जवळच्या व्यक्तीची आपल्या कुटुंबाला संपूर्ण जीवन आरामात गेले पाहीजे किंवा सर्व सुख भेटले पाहिजे म्हणून पुरुष का नेहमी धडपड करत असतो. आपण म्हणतो स्त्री शिवाय घर नाही. खरचं पण पुरुषाशिवाय स्त्री पुर्णपणे जवाबदारी पार नाही पाडू शकत. स्त्री आणि पुरुष हे दोघे एकमेकांच्या सहाय्याने पूर्णपणे सर्व जबाबदाऱ्या पूर्ण करतात. कारण आपण बघतो आजच्या डिजीटल दुनियेत स्त्रीया ह्या पुरुषांपेक्षा एक पाऊल पुढे आहेत पण तरीही स्त्री पुरुष हे समान भूमिकेत येतात. कारण स्त्री आणि पुरुष दोघांना पण समान हक्क देण्यात आलेले आहे. पण पुरुषांच्या जीवनात फक्त घर सांभाळणे इतके मात्र कर्तव्य नसते. पुरुष हा सकाळी उठल्यापासून ते झोपेपर्यंत धडपड करत असतो.

पुरुषाची एक अशी प्रतिमा मी माझ्या बाबांमध्ये पाहिली आहे. मी लहानपणा पासून बाबांच्या सहवासात जास्त होतो. ते पारमार्थिक आहेत. एक सुंदर व्यक्तीमत असलेले नितीवंत नेते सुद्धा आहेत. मी त्यांच्या सहवासात राहून परमार्थिक गुणांच आकलन करत वाढत गेलो. त्यांनी जीवाचे रान करून आम्हा तीन भावांना कुठल्याही गोष्टीची कमरतात न भासू देता मोठ केले. आम्ही मोठे होत असतांना त्यांनी आमच्यावर संस्कार, परमार्थिक गोष्टी, गुणांचा संस्कार टाकत सर्व जवाबदाऱ्या पूर्णपणे व प्रामाणिकपणे पार पाडल्या. मी हे बघुन शिकत गेलो व वयाच्या १८ व्या वर्षी मला जवाबदारी कर्तव्य काय असते ते बहुतेक कळायला लागले. जाबाबदारीकडे माझे पहिले पाउल म्हणून मी एक व्यवसाय सुरू करण्याचे ठरवले. तेव्हा मी शिक्षण घेत असताना सुद्धा व्यवसाय करायचे ठरवले व मी ते बाबांच्या मार्गदर्शनाने पारही पाडले. यशस्वीरित्या पार पाडून जवाबदारी व प्रत्येक कर्तव्याकडे श्री गणेश करून जीवनात एक जवाबदार मुलगा, कर्तापुरुष म्हणून पाऊल उचलण्यास सुरुवात केली. पुढे मी म्हणजे वयाच्या २० व्या वर्षी पारमार्थिक वारकरी झालो. २० व्या वर्षी व मी शिक्षण घेत असताना बरेचशे व्यवसाय सुरुवात केले . खूप अडचणी येऊ लागल्या पण बाबांना बघुन नेहमी प्रेरीत राहून मी खचून न जाता अखंड प्रयत्न करत सर्व काही करत पाऊल पुढे टाकत होतो. या सर्वात बाबा तर सोबत होतेच पण प्रेरणास्त्रोत म्हणून आपला सर्वांचा जाणता राजा शिवछत्रपती शिवाजी महाराज अखंड

प्रेरणा स्त्रोत म्हणून त्याचा आदर्श नेहमी समोर घेऊन अनेक अडचणीना सामोरे जात पुढे चालत गेलो. पुढे चालत असताना कधी आर्थिक तर कधी मानासिक तर कधी शारीरिक अडचणी येत असतात पण तरीही माझी ही जडणघडण अशीच अखंड चालू आहे. पुरुष म्हणून मी फक्त कुटुंब किंवा नातेवाईक इतक्यातच जवाबदारी म्हणून नाही तर समाजिकदृष्ट्या पण माझ्या बऱ्याच जबाबदाऱ्या आहेत.

माझे स्वप्न तर खूप मोठे होते पण घरची आर्थिक स्थिती खूप डगमगली. मी माझ्या स्वप्नांना काही क्षण विश्रांती देऊन म्हणा किंवा त्या स्वप्नांचा त्याग केला असे म्हटले तरी चालेल. तसा मी घरचा सर्वात लहान पण मोठ्या भावांना कष्ट करत बघत एक मनाला चाहूल लागली की आपणही आपल्या जबाबदाऱ्या कर्तव्यपार पाडायचला हवे. असे हे सर्व संस्कार घडले ते फक्त बाबांमुळेच.

## तहान...

**कु. वैष्णवी संतोष घोंगटे**
बी.एस.सी. भाग ३ (जीवशास्त्र)

प्रिय मित्रांनो,

गर्मी आणि ऊन दिवसेंदिवस खूप वाढत चालले आहे, वाढत्या उन्हामुळे अंगाची लाही लाही होत असल्याने फक्त माणसेच हवालदील होत नसून त्यांचा फटका पक्षांनाही बसत आहे. प्रत्येक वर्षी हजारो पक्षी वेळीच पाणी न मिळाल्यामुळे तहानने मृत्युमुखी पडत आहेत.

दरवर्षी एप्रिल महिन्यापासून उन्हाचा सटका वाढू लागला की पक्षी आजारी पडण्याचे प्रमाण वाढते. या वर्षी मात्र जास्त उन्हाचा झटका बसू लागल्याने शहरी भागातील पक्षांचे जीवनमान धोक्यात आल्याची भिती व्यक्त केली आहे.

म्हणून सर्वांना कळकळीची विनंती आहे की आपल्या भिंतीवर किंवा छतावर एक पाण्याचा भांड भरुन जरुर ठेवा जेणेकरुन पक्षी त्यांची तहान भागवू शकतील.



पक्षी दिशा दिशांना, फिरतील ते थव्यांनी
सुकतील कंठ त्यांचे, मग शोधतील पाणी ।।
सुकली तळी जलाची पाणी पिण्यास नाही
त्या सानुल्या जिवांची, होईल लाही लाही ।।
त्यांच्या जीवाकरिता, इतकी करावी सेवा
वाटीत एवढेसे, पाणी भरुन ठेवा ।।

****

# डायरी सोबत व्यक्त होतांना...

**कु. पल्लवी खिरळकर**
बी.एस.सी. भाग ३ (जीवशास्त्र)

अगदी साध असं कारण आहे मीच माझ्या आयुष्यात येण्यामागे. शाळेत असतांना आमच्या सरांनी एकदा आम्हाला डायरी लिहिण्याबद्दल सांगितलं होतं, का लिहायची ? फायदे काय ? आणि बरच काही. आपण कसे होतो ?, काय काय केलं ? या सगळ्या गमती जमतीचे पुरावे आणि ते ही स्वत:च्या शब्दात नि अक्षरात वाचतांना, आठवतांना वेगळीच मजा असते आणि चेहऱ्यावर एक समाधानही तिच्यासोबत स्वत:ला व्यक्त करतानाचा प्रवास हा खूप छान आहे. अगदी बारीक सारीक लिहिण्यापासून ते नेमक लिहिण्यापर्यंतचा प्रवास आणि या प्रवासात स्वतःमध्ये होणारे बदल स्विकारायला ही डायरी कायम साथ देते.

मी लिहायला लागले तेव्हापासून आतापर्यंत मला एक गोष्ट कायम जाणवली ती म्हणजे माणसाच्या भावनिक प्रगतीमध्ये त्याच्या लेखनीचा खूप मोठा वाटा असतो. मनातले चांगले वाईट, हवे नको ते सगळे विचार लेखणीत मोकळे झाले ना, की विचारशक्तीला अजून स्वातंत्र्य मिळतं. व्यक्त होण्याचं, स्वत:ला समजून घेण्याचं आणि महत्वाची गोष्ट म्हणजे या सगळया प्रवासात तुम्ही असे आहात, असं म्हणणार कोणीच नसतं कारण ती कायम तुम्हाला हवं तसं व्यथा होऊ देते, तुम्हाला पाहिजे तेव्हा. बऱ्याच वेळा असं होत की आपण मनातल्या गोष्टी कोणाला सांगू शकत नाही. अगदी आपल्या जवळच्या व्यक्तीलाही, तेव्हा मन मोकळं करायला डायरी खूप मदत करते आणि एकदा का मनातले सगळे विचार पानावर उतरले की मनाला मोकळ झाल्यासारखं वाटतं. सतत सुरू असणारे विचार, मनातला गोधळ शांत होतो.

काही नकारात्मक विचार असतात ते थांबतात, त्यामुळेच मनातली नकारात्मकता थांबवायला, एक नवी सकारात्मकता आत्मसात करायला डायरी खूप मदत करते. आपल्या वैचारिक प्रगतीच्या प्रवासात डायरीचा खूप मोलाचा वाटा असतो. डायरी लिहिणं, तिच्यासोबत गप्पा मारणं म्हणजे आपण आपलं विश्व आपल्याला हवं तसं रेखाटन असतं. कोणत वळण कधी घ्यायचं, का घ्यायचं, कसं घ्यायचं हे ठरवणारं इथे आपण फक्त स्वत: असतो.

****

# आठवणीतील प्रा. बोरले सर....

प्रा.डॉ. आर. टी. परिहार
(रसायनशास्त्र विभाग)

शुक्रवार दि. ३१/३/२०२३ चा दिवस उजाडला. मनामध्ये विचारांचे थैमान नाचू लागले. आज होणारा प्रसंग खरा की खोटा असे स्वप्न आपण पहात आहोत असे वाटावे. पण सत्यात घडणारी गोष्ट तुमच्या मनाचा काडी मात्राचाही विचार करत नाही. अखेर माजी प्राचार्य, विभागप्रमुख वनस्पतीशास्त्र प्रा. एस.व्ही. बोरले सर, विद्यार्थी असो व कोणताही कर्मचारी असो सर्वांच्या मनावर आपुलकीचा ठसा उमटवणारे; त्यांच्या निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. मी चिखली येथील अनुराधा अभियांत्रिकी महाविद्यालयात विद्यापीठाच्या परीक्षेसाठी सहकेंद्राधिकारी म्हणून नियुक्त झालेली होती. त्यामुळे पूर्वतयारी संदर्भात काही माहिती नव्हती. तरीही सरांचा निरोप समारंभाला जाण्याची मनात प्रबळ इच्छा होती. परीक्षेचे कामकाज संपवून निरोप समारंभ कार्यक्रमास फार उशीरा हजेरी लावली. अनेक विद्यार्थीनींनी बोरले सराबद्दल मनोगत व्यक्त केले. प्रत्येक मनोगतातून असे जाणवत होते की हे आमचे आवडते, सर्वांना प्रेमाने समजावून घेणारे वेळप्रसंगी कडक वागून विद्यार्थ्यांचे सर्व कामे वेळेच्या आत करुन घेत. सरांनी फळ्यावर काढलेल्या आकृत्या अतिशय रेखीव व सुंदर असत पण त्या बिनचूक आणि पुस्तकांपेक्षा सोप्या वाटत. त्यांनी काढलेल्या आकृत्या असे वाटते की ते हुबेहुब चित्र असल्याचे वाटे असा हा चित्र कलाकार आपल्या कलाकुसरीने विद्यार्थ्यांवर व आपल्या विषयावर प्रभुत्व निर्माण केले.

महाविद्यालयाच्या जडणघडणीमध्ये प्रा. बोरले सरांचा फार मोलाचा वाटा आहे. महाविद्यालय बाल्यावस्थेत असतांना त्यांचे आजोबा महाविद्यालयाचे प्रथम प्राचार्य श्री.स्व.रा. बोरले त्यांच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेले श्री संजय बोरले सर यांनी नेहमी आपल्या महाविद्यालयाचा प्रगतीचा ध्यास ठेवून कार्य केले. प्राचार्य पदाचा कार्यभार सांभाळत असतांना त्यांना जवळीक साधणाऱ्या, प्रयत्न करणाऱ्यांना सुध्दा आपले कार्य करण्यास भाग पाडत त्यात कधीही कुचराई केली नाही व करु ही दिली नाही.

महाविद्यालयाच्या अनुदाना संदर्भात सर कार्यतत्पर असत. एकदा बुलडाणा येथे एक अत्यंत महत्त्वाची फाईल द्यायची होती. बस अथवा इतर कोणतीही व्यवस्था नसतांना त्यांनी आपली मोटरसायकल वर भर अंधारात व भर पावसात बुलडाणा येथे फाईल पोहचवली. त्या प्रसंगाचे वर्णन ऐकून तर अंगावरती शहारे येतात. बुलडाण्याच्या घाटातील भर पावसातला, अंधारातला मोटरसायकलवरील प्रवास काय अवस्था असेल ? तरीही आपल्या महाविद्यालयाचे काम होत आहे यात त्यांना आनंद होता. असे कार्य फक्त ध्येय वेड लोकच करु शकतात सलाम तुमच्या कार्याला.

महाविद्यालयात सर्वांना सहज उपलब्ध होणारी व्यक्ती म्हणजे श्री. बोरले सर. कोणाला कोणतीही

समस्या असो सर्वात प्रथम आठवण येते ती बोरले सरांची. समस्या कोणतीही असो एखादी कौटुंबिक अथवा वैयक्तिक समस्यावर हमखास रामबाण म्हणजे उपाय बोरले सर. आपल्या अनुभवातून तार्किक विचारातूनच प्रत्येकाचेच समाधान  करणारे. आजकाल आपण एकमेकांशी बोलणे कठीण/दुर्लभ झाले आहे. तेथे आपल्या मनातील कप्पा मोकळे करण्यासाठी हक्काचे ठिकाण म्हणजे बोरले सर. हे सगळ्यांना जमत नाही. त्यांनी ते आपल्या कर्तव्यातून लोकांच्या मनात विश्वास निर्माण केला.

काही अडचण आली की पपहिले बोरले सरांची आठवण येते. आपली नेमकी समस्या काय कधी कधी आपल्याला कळत नसे पण सर त्यांच्या चाणाक्ष्य बुध्दीने ओळखून सांगत तर 'ही' तुमची समस्या आहे आणि 'हे' त्यांचे उत्तर आहे. ते सुध्दा सर्व बाजुंनी विचार करुन. कधीही महाविद्यालय अथवा इतर कोणाचेही नुकसान होणार नाही याचा विचार करुन योग्य ती उपाय सांगत. खरचं असे लोक जन्माला यावे लागतात.

खरं तर बोरले सरांबद्दल लिहायला बसलो तर अनेक भावनांचा कल्लोळ मनात उठतो. अनेक प्रसंग आठवतात ते सगळे लिहित बसले तर आचार्य पदवीचा एक चांगला प्रबंध होईल यात तिळमात्रही शंका नाही.

निरोप समारंभाचे शेवटचे क्षण जे काही बघितले. बोरले सरांबद्दल गौरीशंकर सेवा समिती सदस्य त्यात सचिव डॉ. पी.जी. मोहता, डॉ. अरविंद कोलते इतर मान्यवर गण. प्रत्येकाच्या कृतीतून विचारातून बोरले सरांनी केलेल्या कार्याची पावती मिळत होती.

आपल्या सोबत सहकारी म्हणून कार्य करणारे प्रा.डॉ.वाय.पी. पाटील यांचे प्रमोशन झाले त्यासाठी अगदी निर्मळ मनाने, पुढाकार घेऊन सहकार्य केली. नाही तर जगात आपण लोक पहातो अनुभवतो पण बोरले तर तसे नाही.

आपला तर निरोप समारंभाचा सत्कार होत असतांना आपल्याला सहकार्य करणाऱ्या व्यक्तींना सुध्दा बोरलेतर विसरले नाहीत. म्हणून त्यांनी डॉ. वाय.पी. पाटील, प्रयोगशाळा परिचर श्री. राजु डाबेराव यांना सुध्दा सहकार्य केल्याबद्दल सत्कार करणारे लोक फार वेगळेच असतात. यातूनच त्यांचा नेतृत्व गुणाचा सर्वांना गुण दिसून येतो. धन्य त्यांच्या मातापित्यांना व त्यांच्यावर संस्कार करणाऱ्या इतरांना सुध्दा.

निरोप समारंभाच्या दिवशी फक्त लोकांच्या भावना जाणवतात नंतर सर्व काही लोक विसरुन जातात. पण बोरले सरांच्या बाबतीत असे कधीही होणार नाही. कारण बोरले सरांनी प्रत्येकाच्या मनात आपला वेगळा ठसा निर्माण केलेला आहे. तो कोणीही कधीही विसरु शकणार नाही. अशा या अष्टपैलू व्यक्तीमत्त्वाला मानाचा मुजरा करुन आलेल्या भावना व शब्दांना विराम देतो.

सर, तुमचे पुढील आयुष्य सुखीसमाधानी जावो ही प्रार्थना.

*****

# संग्रहित....

प्रा.कु. कल्याणी एस. जवरे
(गणित विभाग)

**वाचना प्रेरणा**

गंभीर, विनोदी रंगीबेरंगी फसव्या आकर्षक मुखपृष्ठांची,
गुंतागुंतीचं कथानक असलेली अगणित माणसं, वाचता
येतात भोवतालच्या गर्दीत, काही डोक्यावरुन जातात
तर काही डोक्यात पण म्हणून वाचन थांबवू नये.

– गुरु ठाकूर

**दीपोत्सव**

बाहेर आहे झगमगाट, उजळलाय सारा गाव
आतल्या अंधाराचं काय ? तिथे एक दिवा लाव
नेणीवेच्या दारावर, जाणीवेच्या पारावर
जिथे जिथे असेल वाव, तिथे एक दिवा लाव !

– गुरु ठाकूर

